<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ (साक्षीदार) यांचा पुरावा</u> :–

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : अनिल बाळासाहेब कसार,

वय : ३८ वर्षे, धंदा : खाजगी काम,

राहणार : वडाळामहादेव, ता. श्रीरामपुर, जि.अहमदनगर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सी. बी. अग्रवाल यांच्यातर्फे–</u>**

**१.** दिनांक २७/०२/२०२२ रोजी पोलिसांनी मला फिर्यादी विजय बनसोडे यांच्या घरी बोलाविले होते, त्यावरुन मी त्याठिकाणी गेलो होतो. पोलिसांनी मला नाव विचारले व माझी पंच म्हणुन सही घेतली होती. त्यावेळेस घटनास्थळी फिर्यादी विजय बनसोडे हजर होते. याशिवाय पोलिसांनी माझ्यासमक्ष काहीही केले नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीला **निशाणी क्रमांक ५०** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे भारतीय पुरावा कायदा, १८७२ कलम १५४ प्रमाणे पुरावा घेण्याची परवानगी अभियोग पक्षास विनंती वरुन देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पोलिसांना माझ्यासमक्ष फिर्यादी याने दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष गुन्हयातील लाकडी काठी जप्त केली होती. पंचनामा तयार करताना गुन्हयातील लाकडी काठी ही पोलिसांजवळ असल्याचे मी बघितले होते. गुन्हयातील जप्त काठी आर्टिकल 'अ' हीच काठी पोलिसांजवळ होती किंवा नाही हे मी सांगु शकत नाही. हे मला माहिती नाही की, घटनास्थळी बाबासाहेब खेमनर हे होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला, तो वाचुन खरा असल्यामुळे मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या ओळखीचे असल्यामुळे त्यांना वाचविण्याकरिता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ करिता वकील श्री. के. बी. शेख यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : २८/०१/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.